कार्यक्रमानं साधलं गेलं. दूरदर्शनवर नाट्यवलोकन झालं की नाटकाचा प्रेक्षक वाढायचा ही वस्तुस्थिती निर्माते नाकारु शकणार नाही. पुढे दुर्दैवानं तो कार्यक्रम बंद झाला. आज वाहिन्यांवरुन नाटकांच्या संदर्भात जे कार्यक्रम सादर केले जातात त्यांचं स्वरुप घडामोडींची माहिती देण्याइतपत जुजबी असतं. सर्व वाहिन्यांवरती संवेदनाशील, नाट्यप्रेमी निर्माते असून ही परिस्थिती यावी याचं वाईट वाटतं. माझं सर्व वाहिन्यांना आवाहन आहे. नाट्यावलोकनसारखे कार्यक्रम आपण प्रसारित केलेत तर मराठी रंगभूमीला ते उपकारक ठरेल. मराठी रंगभूमीचा दुरावणारा प्रेक्षक तिकडे कसा वळेल हेही बघा. नाटकांकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली तर ज्या रंगभूमीचे कलावंत मालिकांत काम करतात ती कलावंताची गंगोत्री कालांतराने आटेल. जे कुणाच्याच हिताचं नाही. रंगभूमीच्या आणि तुमच्याही.

रसिकहो, आपलं सौजन्य आणि सहनशीलता गृहीत धरुन मी माझे विचार आपल्यासमोर सविस्तर मांडले. बोलण्याच्या ओघात काही अप्रिय गोष्टी ऐकवल्या. अनवधानानं नाही तर जाणीवपूर्वक सांगितल्या. मृदु, मधुरभाषी अशी माझी ख्याती नाही हे आपण जाणताच. सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात् (खरं पण आवडेल असं बोलवं) हे मी मानतो. पण न ब्रूयात् सत्यमप्रियम् (अप्रिय सत्य सांगू नये) हे मी मानीत नाही. मला ती माझ्याशीच केलेली प्रतारणा वाटते. मी जे काही बोललो त्यापाठीमागे प्रेरणा होती एकाच भावनेची. ज्या रंगभूमीनं मला भरभरुन दिलं, माझ्या जगण्याला अर्थ दिला त्या माझ्या मराठी रंगभूमीचा उत्कर्ष व्हावा. आणि तुमचीही भावना वेगळी काय असणार? शेवटी तुम्ही काय, मी काय? नाटक तुमच्या माझ्या रक्तातच आहे !